प्रेसनोट दिनांक १२/१०/२०२१

**वनविभाग कार्यालय, ठाणे येथील वनपाल व वनरक्षक यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे दैनंदिनी क्र. | :- | वाशी पोलीस ठाणे दैनंदिनी क्र. ४९/२०२१<br>दि.१२/१०/२०२१ रोजी २०:२७ वा |
| लोकसेविकेचे नाव व कार्यालय | :- | १) श्री. संजय मनोहर पवार, वनपाल, (वर्ग ३)<br>२) श्री.अमित मोहन राणे, वनरक्षक (वर्ग ३)<br>३) श्री.दिपक प्रकाश वर्मा, वनरक्षक (वर्ग ३)<br>सर्व नेमणूक ठाणे वनपरिक्षेत्र कार्यालय, ठाणे |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ५,००,०००/- तडजोडीअंती रू. ३,५०,०००/- स्विकारण्याचे कबूल केले |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू. ३,५०,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार हे साईट सुपरवायजर यापदावर काम करीत असलेल्या सीटी सेंटर मॉल भुखंड क्र. १८, सेक्टर नं. १९ डी, वाशी याठिकाणी डिमॉलेशन काम चालू असताना सदर ठिकाणी नमुद आलोसे क्र. १ ते ३ यांनी जावून सदरचे काम हे ठाणे किक फ्लेमिंगो राष्ट्रीय अभयारण्य सीमेपासून १० किमी अंतराचे संवेदनशील क्षेत्र (इको सेन्सिटीव्ह झोनमध्ये) येत असल्याने तुम्ही सदर क्षेत्रात काम करीत असून राष्ट्रीय वन्य जीव मंडळाची व वनविभाग वन परिक्षेत्र, ठाणे यांची परवानगी घेतली नसल्याचे सांगून तक्रारदार यांना नोटीस अदा केली होती. व तक्रारदार यांच्याकडे रू. ५,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून, तसेच पुढील सहा महिन्यासाठी प्रती महिना रू.२५,०००/- हप्ता मागितले बाबतची तक्रार, तक्रारदार यांनी दि.११/१०/२०२१ रोजी दिली होती.<br>तक्रारीच्या अनुषंगाने दि.११/१०/२०२१ रोजी शासकिय पंचा समक्ष लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी दरम्यान वरिल लोकसेवक क्रमांक २ व ३ यांनी मेसर्स सीटी सेंटर वाशी मॉलचे बांधकामाचे काम सूरू ठेवण्यासाठी स्वतःकरीता तसेच त्यांचे वरिष्ठ अधिकारी यांचेसाठी तक्रारदार यांच्याकडे तडजोडीअंती रू.३,५०,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक १२/१०/२०२१ रोजी करण्यात आलेल्या लाचेच्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक क्र. १ व ३ यांनी सेक्टर १७ वाशी याठिकाणी लोकसेवक क्र. १ याच्या टाटा नेक्सॉन गाडी नंबर एमएच ०४/केएल/३००० या गाडीमध्ये तक्रारदार यांच्याकडून रू. ३,५०,०००/- लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर त्यांना १६.५२ वा. रंगेहाथ पकडण्यात आले आहे. त्यानंतर लोकसेवक क्र. २ यांना ताब्यात घेण्यात आले आहे. |

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.**

---

मार्गदर्शन अधिकारी :- मा.श्री.डॉ.पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- **acbmaharashtra@mahapolice.gov.in**
ई-मेल :- **spacbthane@mahapolice.gov.in**
ऑनलाईनतक्रार
ॲप्लीकेशन :- **acbmaharashtra.net**
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटसॲप क्र. :- ९९३०९९७७००

शिवराज बेंद्रे
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई